2 4 JUL 2026
तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठात लोकमान्य टिळक जयंती

प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात गुरूवारी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचा जयंती साजरी करण्यात आली. शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, डॉ. शशिकांत पंचगल्ले, डॉ. दादा ननवरे, दिपाली कोळी, प्रियांका निकम, यास्मिन मुल्ला, अनुजा घोरपडे, काजल कुंभारदरे यांच्यासह प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.



कोल्हापूर : लोकमान्य टिळक यांना अभिवादन करताना प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. महादेव देशमुख, डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार आदी.

2 4 JUL 2026
पुण्यनगरी

# विद्यापीठात लोकमान्य टिळक जयंती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंतीनिमित्त प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, डॉ. शशिकांत पंचगल्ले, डॉ. दादा ननवरे, दीपाली कोळी, प्रियांका निकम, यास्मिन मुल्ला, अनुजा घोरपडे, काजल कुंभारदरे यांच्यासह प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

24 JUL 2026

सकाळ

# विद्यापीठात लोकमान्य टिळक यांना अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आज लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती झाली. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, शशिकांत पंचगल्ले, दादा ननवरे, दीपाली कोळी, प्रियांका निकम, यास्मिन मुल्ला, अनुजा घोरपडे, काजल कुंभारदरे उपस्थित होते.

2 4 JUL 2026

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात लोकमान्य टिळक जयंती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात गुरुवारी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 JUL 2026
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाचा कौशल्य विकासासाठी हुबळीच्या ट्रस्टसमवेत सामंजस्य करार



कराराच्या प्रतींचे हस्तांतरण करताना कुलसचिव डॉ. विलास शिंदे आणि एम. एन. नायक. सोबत उपस्थित अधिकारी व शिक्षक.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासाला, रोजगार क्षमतेला आणि उद्योगाभिमुख प्रशिक्षणाला चालना देण्याच्या उद्देशाने शिवाजी विद्यापीठ, विद्यापीठाची सेक्शन-८ कंपनी एसयूके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाऊंडेशन आणि देशपांडे एज्युकेशनल ट्रस्ट, हुबळी (कर्नाटक) यांच्यात त्रिपक्षीय सामंजस्य करार करण्यात आला.

या सामंजस्य कराराच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठ, तसेच विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी कौशल्य विकास, पुनर्कौशल्य आणि कौशल्यवर्धन यासाठी विविध उपक्रम राबवण्यात येणार आहेत. उद्योग क्षेत्राच्या गरजांनुसार विद्यार्थ्यांना आवश्यक कौशल्ये उपलब्ध करून देऊन त्यांची रोजगार क्षमता, व्यावसायिक क्षमता आणि करिअरसाठीची तयारी अधिक सक्षम करणे हा या कराराचा प्रमुख उद्देश आहे.

यावेळी देशपांडे एज्युकेशनल ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. एन. नायक म्हणाले, देशपांडे एज्युकेशनल ट्रस्टचा 'देशपांडे स्किलिंग' हा महत्त्वपूर्ण उपक्रम असून, त्याचे मुख्यालय हुबळी (कर्नाटक) येथे आहे. ग्रामीण व निमशहरी भागातील युवकांना रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या संस्थेमार्फत उद्योगाभिमुख कौशल्य प्रशिक्षण दिले जाते. प्रामुख्याने आवश्यक व्यक्तिमत्त्व विकास व औद्योगिक कौशल्ये या अनुषंगाने विविध प्रशिक्षण कार्यक्रम राबवले जातात. या करारानुसार विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकासासाठी विविध उपक्रम हाती घेतले जातील. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत म्हणाले, या सामंजस्य करारामुळे विद्यार्थ्यांना उद्योगाच्या बदलत्या गरजांनुसार कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळणार असून, विद्यापीठाच्या 'कुशल, सक्षम आणि उद्योगसज्ज मनुष्यबळ निर्मिती' या उद्दिष्टाला निश्चितच बळकटी मिळेल. विशेषतः ग्रामीण व निमशहरी भागातील विद्यार्थ्यांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्याच्या कामी हा करार महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल.

या सामंजस्य करारावर एम. एन. नायक आणि शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी स्वाक्षरी केल्या. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, संचालक डॉ. सागर डेळेकर, रवी चव्हाण, एम. बी. शेख, रवी डोळी, डॉ. हेमराज यादव, सुभाष माने यांच्यासह तिन्ही संस्थांचे अधिकारी उपस्थित होते.


कोल्हापूर शिवाजी विद्यापीठ, एसयूके-आरडीएफ आणि हुबळी येथील देशपांडे एज्युकेशनल ट्रस्ट यांच्यात कुलगुरू डॉ. राजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत सामंजस्य करार झाला.

2 4 JUL 2026

क्रांतीसिंह


# कुलगुरूंची साहित्यिक चंद्रकुमार नलगे यांच्याशी भेट

कोल्हापूर(प्रतिनिधी):- शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी आज ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकुमार नलगे यांची सदिच्छा भेट घेऊन प्रकृतीची विचारपूस केली. कुलगुरूंच्या या अचानक भेटीमुळे ९२ वर्षांचा हा साहित्यिक भारावून गेला. कुलगुरु डॉ. रजनीश कामत यांनी नलगे यांची त्यांच्या कोतोली रोडवरील निवास स्थानी जाऊन त्यांच्या प्रकृतीची आस्थेने विचारपूस केली. या भेटी दरम्यान डॉ. कामत आणि नलगे यांच्यात मनमोकळा संवाद झाला. कुलगुरू डॉ. कामत यांनी नलगे यांच्या साहित्यिक योगदानाबरोबरच सामाजिक, शैक्षणिक योगदानाबद्दल कृतज्ञतापूर्ण भावना व्यक्त केल्या. शिवाजी विद्यापीठाच्या कमवा आणि शिका या योजनेसाठी दिलेल्या योगदानाबद्दल तसेच अन्य जुन्या आठवणींविषयी बोलताना चंद्रकुमार नलगे यांना गहिवरुन आले. विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून आपण इतक्या आस्थेने विचारपूस करण्यासाठी आलात, असे म्हणत असताना त्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू दाटून आले. त्यांनी आपली काही निवडक पुस्तके कुलगुरूंना भेट दिली. यावेळी प्रदीप नलगे, अनिता नलगे आणि विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर उपस्थित होते.



2 4 JUL 2026
आरडंर ह्यू
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुलगुरूंच्या भेटीने भारावले ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकुमार नलगे



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी आज ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकुमार नलगे यांची सदिच्छा भेट घेऊन प्रकृतीची विचारपूस केली. कुलगुरूंच्या या अचानक भेटीमुळे ९२ वर्षांचा हा साहित्यिक भारावून गेला.

कुलगुरु डॉ. रजनीश कामत यांनी नलगे यांची त्यांच्या कोतोली रोडवरील निवासस्थानी जाऊन त्यांच्या प्रकृतीची आस्थेने विचारपूस केली.

या भेटीदरम्यान डॉ. कामत आणि नलगे यांच्यात मनमोकळा संवाद झाला. कुलगुरू डॉ. कामत यांनी नलगे यांच्या साहित्यिक योगदानाबरोबरच सामाजिक, शैक्षणिक योगदानाबद्दल कृतज्ञतापूर्ण भावना व्यक्त केल्या.

शिवाजी विद्यापीठाच्या कमवा आणि शिका या योजनेसाठी दिलेल्या योगदानाबद्दल तसेच अन्य जुन्या आठवणींविषयी बोलताना चंद्रकुमार नलगे यांना गहिवरुन आले. विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून आपण इतक्या आस्थेने विचारपूस करण्यासाठी आलात, असे म्हणत असताना त्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू दाटून आले. त्यांनी आपली काही निवडक पुस्तके कुलगुरूंना भेट दिली. यावेळी प्रदीप नलगे, अनिता नलगे आणि विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2 4 JUL 2026

आरंभ वृत्त

# शिवाजी विद्यापीठासाठी लवकरच स्वतंत्र एआय प्रणाली: कुलगुरू

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या प्रशासकीय कामकाजासाठी स्वतंत्र आणि सुरक्षित अशी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित प्रणाली लवकरच विकसित करण्याची महत्त्वपूर्ण घोषणा कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी केली. प्रशासन, अध्यापन, संशोधन, नवोपक्रम आणि विद्यार्थी–सुविधा या पाच प्रमुख क्षेत्रांमध्ये ही प्रणाली उपयुक्त ठरणार असून, विद्यापीठाच्या कार्यपद्धतीला अधिक वेग, अचूकता आणि कार्यक्षमतेची दिशा मिळणार आहे.

''स्वतःच्या सुरक्षित सर्व्हरवर चालणारी ही प्रणाली विद्यापीठाच्या डिजिटल परिवर्तनातील एक निर्णायक पाऊल ठरेल जिथे गती, अचूकता आणि गोपनीयता एकाच वेळी साध्य होईल,'' असे डॉ. कामत यांनी यावेळी नमूद केले.

शिवाजी विद्यापीठात आज विद्यापीठातील सर्व अधिकारी, अधिष्ठाता, संचालक, कर्मचारी आणि विद्यार्थी–विद्यार्थिनी यांच्यासाठी एआयच्या वापराबाबत विशेष कार्यशाळा झाली. त्यावेळी कुलगुरू डॉ. कामत बोलत होते. कार्यशाळेत टाटा कम्युनिकेशन्स लि. कंपनीचे वरिष्ठ एआय अधिकारी बळवंत गोरड यांनी मार्गदर्शन केले. प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव आणि वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरू म्हणाले, विद्यापीठातील बैठका, अधिकृत टिपण्या, नियमावली, अधिनियम, अध्यादेश, तसेच विविध प्रशासकीय नोंदींचे विश्लेषण करण्यासाठी वेळ खर्च होतो. ही प्रक्रिया सुलभ करण्यासाठी एआयचा वापर केल्यास कागदपत्रांचे पिन–पॉईंट विश्लेषण, संदर्भाधारित नोंदी, नियमांची पडताळणी आणि आवश्यक ते संदर्भ स्वयंचलितपणे उपलब्ध होऊ शकतील. ही प्रणाली पूर्णपणे शिवाजी विद्यापीठाच्या सर्व्हरवर कार्यरत राहणार असल्याने डेटा सुरक्षा, गोपनीयता आणि संस्थात्मक माहितीचे संरक्षण यांना प्राधान्य दिले जाणार आहे.

24 JUL 2026

आरडेर क्यु

# समर्पित, नियोजनबद्ध प्रयत्नांमुळेच यशप्राप्ती: कुलगुरू डॉ.राजनीश कामत

कोल्हापूर : विद्यार्थ्यांनी समर्पितपणे आणि नियोजनबद्ध प्रयत्न केल्यास त्यांना निश्चित यश प्राप्त होते, हे विद्यापीठाच्या संघाने विविध स्पर्धांतील घवघवीत यशातून सिद्ध केले आहे, असे प्रतिपादन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी आज येथे केले.

विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२५-२६मध्ये युवा महोत्सव, राष्ट्रीय कव्वाली, आविष्कार, अन्वेषण स्पर्धेमध्ये प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये आज झाला. त्यावेळी अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. कामत बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ.ज्योती जाधव यांची विशेष उपस्थिती होती.

कुलगुरू म्हणाले, युवा महोत्सव, कव्वाली, आविष्कार, अन्वेषण स्पर्धेमध्ये विद्यापीठ आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग उत्साहवर्धक आहे. राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील विविध स्पर्धांमध्ये मिळविलेले हे यश निश्चित उल्लेखनीय व वाखाण्याजोगे आहे.

24 JUL 2026

आरंभ न्यूज

# खेळाडूंसाठी मानसशास्त्र आणि नैतिकता अत्यंत महत्वाचे - अवंती दामले

कोल्हापूर : खेळाडूंनी जागरूक राहून मानसशास्त्र आणि नैतिकता या महत्वाच्या गोष्टींकडे लक्ष देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन क्रीडा आहारतज्ज्ञ अवंती दामले यांनी आज येथे केले. शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागामार्फत राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात ३९;क्रीडा मानसशास्त्र, क्रीडा पोषण आणि डोपिंग३९; या विषयावर विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी क्रीडा आहारतज्ज्ञ दामले मार्गदर्शन करीत होत्या. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.राजनीश कामत उपस्थित होते. प्र-कुलगुरू डॉ.ज्योती जाधव यांची विशेष उपस्थिती होती.


क्रीडा आहारतज्ज्ञ दामले म्हणाल्या, आपल्या देशाला जागतिक स्तरावर मान्यता मिळण्यासाठी खेळाडूंना प्रोत्साहित करणे महत्वाचे आहे. येणार पुढील काळ हा खेळासाठी आणि खेळाडूंसाठी अत्यंत पोषक आहे. देशाला पुढे घेवून जाण्यासाठी खेळाडूंनी स्वत:मध्ये बदल करणे आवश्यक आहे. अन्न हे आपले पोषक घटक आहे. परंतू, आपण त्याला फारसे महत्व देत नाही. फक्त आपल्या जिभेचा विचार करतो, आरोग्याचा विचार करीत नाही. खेळाडूंनी याच गोष्टींकडे गांभीर्याने लक्ष केंद्रीत करणे महत्वाचे आहे. आपला आहार आपल्या खेळास सहायय करणारा असणे गरजेचे असते.

सामना असो वा नसो खेळातील गुणवत्ता उंचावण्यासाठी सातत्याने सराव करणे आवश्यक आहे. शरीराची झिज भरून

(फोटो व बातमी पान ३ वर)

24 JUL 2026

आरडंर व्ह्यू



(पान १ वरुन) काढण्यासाठी झोप महत्वाची आहे. त्याचबरोबर, स्मार्टफोनवर लगाम ठेवणेही गरजेचे आहे. उत्कृष्ट खेळाडू घडण्यासाठी अनुशासन, निष्ठा आणि समर्पण अत्यंत महत्वाचे आहे. डाळी, कडधान्य, भरडधान्य, मध, दूध, गूळ, बटाटा यामध्ये कार्बोहायड्रेडस् मोठया प्रमाणात मिळतात. त्याचा आहारामध्ये निश्चित समावेश करावा. दररोज योग्य प्रमाणात पाणी पिणे महत्वाचे असते. जे पदार्थ हृदय, किडनी आणि हाडांवर दुष्परिणाम करतात आणि ज्या पदार्थांवर बंदी आहे त्यापासून खेळाडूंनी दूर राहिले पाहिजे. आपण अविचाराने कृती करणार नाही हे निश्चित केले पाहिजे.

फिजिओथेरपिस्ट व सल्लागार डॉ.यशवंत वेलणकर म्हणाले, खेळात यश

24 JUL 2026

सकाळ

# शिवाजी विद्यापीठात साकारले आधुनिक चुंबकीय ढवळणी यंत्र


## डिझाईनला पेटंट; द्रव नमुन्यांसाठी उपयुक्त

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २३ : येथील संशोधकांनी विकसित केलेल्या 'मॅग्नेटिक स्टिरर विथ पार्टिशन्ड ऑइल बाथ' या आधुनिक चुंबकीय ढवळणी यंत्राच्या संरचनेला भारतीय पेटंट मिळाले आहे. विविध शास्त्रीय अभिक्रियांसाठी उपयुक्त असलेल्या या यंत्राचे डिझाईन तयार करण्यात राजाराम महाविद्यालयासह विद्यापीठाच्या संशोधकांनी योगदान दिले आहे.

राजाराम महाविद्यालयातील डॉ. सूरज सोनवणे, अनिल मराळे, डॉ. ओमप्रकाश पवार, विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी येथील मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे डॉ. हर्षवर्धन पंडित हे या डिझाईनचे संशोधक आहेत.

हे उपकरण रसायनशास्त्र, औषधनिर्माण, जैवतंत्रज्ञान, अन्नप्रक्रिया तसेच विविध संशोधन प्रयोगशाळांमध्ये द्रव नमुन्यांचे एकाच वेळी सुरक्षित, अचूक आणि कार्यक्षम तसेच तापमान नियंत्रण करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. विभागीय तैलस्नान या वैशिष्ट्यपूर्ण संकल्पनेमुळे एकाच उपकरणात स्वतंत्र विभागांमध्ये एकाच वेळी विविध नमुन्यांवर प्रयोग करता येतात. त्यामुळे नमुन्यांमधील परस्पर परिणाम टाळले जातात. प्रयोगांची अचूकता वाढते आणि संशोधन अधिक सुरक्षित व परिणामकारक बनते. या संशोधनाबद्दल कुलगुरू डॉ. आर. के. कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे प्रभारी संचालक डॉ. अजित कोळेकर, राजाराम महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अनिता बोडके यांचे मार्गदर्शन लाभले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात साकारलेले आधुनिक चुंबकीय ढवळणी यंत्र.

2 4 JUL 2026

सिंधुदुर्ग समाचार


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आधुनिक चुंबकीय ढवळणी यंत्राच्या डिझाईनला पेटंट

**शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांचे यश**

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** येथील संशोधकांनी विकसित केलेल्या 'मॅग्नेटिक स्टिरर विथ पार्टिशन्ड ऑइल बाथ' या आधुनिक चुंबकीय ढवळणी यंत्राच्या संरचनेला भारतीय पेटंट प्राप्त झाले आहे. विविध शास्त्रीय अभिक्रियांसाठी अत्यंत उपयुक्त असलेल्या या यंत्राचे डिझाईन तयार करण्यात राजाराम महाविद्यालयासह शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी योगदान दिले आहे.

राजाराम महाविद्यालयातील डॉ. सूरज अशोक सोनवणे, अनिल पांडुरंग मराळे, डॉ. ओमप्रकाश बन्सीधर पवार आणि शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनियरिंग अँड टेक्नॉलॉजी येथील मेकॅनिकल इंजिनियरिंगचे डॉ. हर्षवर्धन चंद्रकांत पंडित या अभिनव डिझाईनचे संशोधक आहेत.



संशोधकांनी विकसित केलेले उपकरण

हे उपकरण रसायनशास्त्र, औषधनिर्माण, जैवतंत्रज्ञान, अन्नप्रक्रिया तसेच विविध संशोधन प्रयोगशाळांमध्ये द्रव नमुन्यांचे एकाच वेळी सुरक्षित, अचूक आणि कार्यक्षम मिश्रण (Stirring) तसेच तापमान नियंत्रण करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. विभागीय तैलस्नान (Partitioned Oil Bath) या वैशिष्ट्यपूर्ण संकल्पनेमुळे एकाच उपकरणात स्वतंत्र विभागांमध्ये एकाच वेळी विविध नमुन्यांवर प्रयोग करता येतात. त्यामुळे नमुन्यांमधील परस्पर परिणाम टाळले जातात, प्रयोगांची अचूकता वाढते आणि संशोधन अधिक सुरक्षित व परिणामकारक बनते.

या उपकरणाच्या आकर्षक, कार्यक्षम आणि आधुनिक औद्योगिक रचनेला डिझाईन पेटंट मंजूर झाल्यामुळे संशोधकांच्या या नाविन्यपूर्ण कार्याला राष्ट्रीय मान्यता मिळाली आहे. या डिझाईन पेटंटमुळे भविष्यात संशोधन प्रयोगशाळांसाठी अधिक कार्यक्षम उपकरणांच्या निर्मितीस चालना मिळणार असून, उद्योग-शैक्षणिक सहकार्य, तंत्रज्ञान विकास आणि 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेलाही बळ मिळणार आहे.

या संशोधनाबद्दल कुलगुरू डॉ. राजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे तसेच स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीचे प्रभारी संचालक डॉ. अजित कोळेकर तसेच राजाराम महाविद्यालयाच्या प्राचार्य. डॉ. अनिता बोडके यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले.

2 4 JUL 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# २० दिवसांत ४७२ निकाल जाहीर

## ऑनस्क्रीन मार्किंगने वाढविला वेग; विद्यापीठ परीक्षा मंडळाची कामगिरी

डेटा रिसर्च

संतोष मिठारी

**कोल्हापूर : ऑनस्क्रीन मार्किंगने शिवाजी विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांच्या निकालाचा वेग वाढविला आहे. मार्च-एप्रिल या उन्हाळी सत्रात वीस दिवसांमध्ये ८६० पैकी ४७२ परीक्षांचे निकाल जाहीर झाले. सलग आठव्या सत्रात विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने तीस दिवसांत सर्व परीक्षांचे निकाल जाहीर केले.**

विज्ञान व तंत्रज्ञान, मानवविद्या, वाणिज्य व व्यवस्थापन, आंतरविद्याशाखीय अभ्यास या विद्याशाखांचे २१ जुलैपर्यंत परीक्षा मंडळाने एकूण ८६० परीक्षा पैकी ८५० परीक्षांचे निकाल (९८.८४ टक्के) जाहीर केले. कमी दिवसांत निकाल जाहीर झाल्याने विद्यार्थ्यांना पुढील प्रवेश प्रक्रिया, नोकरी अथवा स्पर्धा परीक्षांसाठी अधिक वेळ उपलब्ध झाला.

### डेटा काय सांगतो ?

- पहिल्या बारा दिवसांत २८.१ टक्के, तर २६ ते ३० दिवसांत २६. ६ टक्के निकाल जाहीर झाले. म्हणजेच जवळपास प्रत्येक चार निकालांपैकी एक निकाल महिन्याच्या अखेरीस जाहीर झाला.



ऑनस्क्रीन मार्किंगमुळे कमी दिवसांमध्ये निकाल लावण्याची गती वाढली आहे. हिवाळी सत्रापासून बीबीए., बीसीए अभ्यासक्रमांच्या परीक्षांचेही ऑनस्क्रीन मूल्यमापन केले जाईल. प्राध्यापक, कर्मचाऱ्यांच्या सहकार्यामुळे तीस दिवसांत निकाल जाहीर करणे शक्य झाले आहे.

**- डॉ. अजितसिंह जाधव,**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

### कालावधीनिहाय लागलेले निकाल




| विद्याशाखा | परीक्षा | निकाल | प्रलंबित |
|---|---|---|---|
| विज्ञान व तंत्रज्ञान | ३७३ | ३६९ | ४ |
| मानवविद्या | २०२ | २०१ | १ |
| वाणिज्य व व्यवस्थापन | १२३ | ११९ | ४ |
| आंतरविद्याशाखीय अभ्यास | १६२ | १६१ | १ |
| एकूण | ८६० | ८५० | १० |

### विद्याशाखानिहाय निकाल

**विज्ञान व तंत्रज्ञान**
- १-१२ दिवस : १००
- १३-१५ दिवस : २२
- १६-२० दिवस : ५०
- २१-२५ दिवस : ८४
- २६-३० दिवस : ११३

**मानवविद्या**
- १-१२ दिवस : ५४
- १३-१५ दिवस : ११
- १६-२० दिवस : ५०
- २१-२५ दिवस : ३२
- २६-३० दिवस : ५४

**वाणिज्य व व्यवस्थापन**
- १-१२ दिवस : २८
- १३-१५ दिवस : ९
- १६-२० दिवस : २२
- २१-२५ दिवस : २६
- २६-३० दिवस : ३४

**आंतरविद्याशाखीय अभ्यास**
- १-१२ दिवस : ५७
- १३-१५ दिवस : २३
- १६-२० दिवस : ४६
- २१-२५ दिवस : १०
- २६-३० दिवस : २५